प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. 04.05.2020**

**सिडकोच्या विविध गृहनिर्माण योजनांतील पात्र व अपात्र अर्जदारांची यादी ऑनलाइन उपलब्ध**

सिडको महागृहनिर्माण योजना - २०१९ व सिडकोच्या इतर गृहनिर्माण योजनांतील यशस्वी अर्जदारांच्या कागदपत्रांची पडताळणी पूर्ण करण्यात आली असून अर्जदारांना त्यांचा पात्र-अपात्र निकाल त्यांच्या लॉग-इनच्या माध्यमातून पाहता येणार आहे.

सदर योजनांतील पात्र अर्जदारांना वाटपपत्रे देण्यासंदर्भातील काम सुरू असून लवकरच याबाबत सिडकोतर्फे संबंधित अर्जदारांना कळवण्यात येईल. त्याचबरोबर अपात्र ठरलेल्या अर्जदारांना फेरतपासणी/अपील करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार असून त्याविषयीची माहिती संबंधित अर्जदारांना वेळोवेळी निवारा केंद्राच्या अधिकृत संकेतस्थळावरून कळविण्यात येईल.

कोविड - १९ मुळे लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीमध्ये देखील सिडकोतर्फे महागृहनिर्माण योजना २०१८ मधील प्रतिक्षा यादी १ व २ तसेच शिल्लक राहिलेल्या सदनिकांतील खारघर येथील स्वप्नपूर्ती, व्हॅलीशिल्प, वास्तुविहार, सेलीब्रेशन, नेरूळ येथील एनआरआय कॉम्प्लेक्स व उलवेतील उन्नती या गृहनिर्माण प्रकल्पातील योजनांचा निकाल यापूर्वी जाहिर करण्यात आला आहे.

याशिवाय सिडकोच्या विविध गृहनिर्माण योजनांतील ज्या सदनिकाधारकांना ५ वा हफ्ता भरतेवेळी टाळेबंदीमुळे अडचण आली आहे अथवा ते हफ्ता भरू शकले नाहीत, अशा सदनिकाधारकांना यापूर्वीच ३० जून २०२० पर्यंत सदनिकेचा हफ्ता भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे ज्या सदनिकाधाराकांना येस बँकेच्या समस्येमुळे हफ्ता भरतेवेळी अडचण आली आहे वा ते हफ्ता वेळेत भरू शकले नाही, अशा सदनिकाधारकांच्या विलंब शुल्काबाबतही निर्णय घेण्यात येणार आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा.संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धी देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**